Newspaper : Navshakti

Article date : 13th February 2018

Article regarding Platinum Jubilee Celebration

# पोदार साजरी करत आहे यशाची पंचाहत्तर वर्षे!

**प्रतिनिधी**

मुंबई, सोमवार - काळाबरोबर चालणाऱ्या आणि वेळेचं भान आणून देणाऱ्या घड्याळाला आपल्या शिरावर दिमाखानं मिरवणाऱ्या माटुंग्याच्या रा. आ. पोदार महाविद्यालयाला नुकतीच पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. जेव्हा वाणिज्य शाखेतील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयांचा उल्लेख केला जातो तेव्हा शिक्षण प्रसारक मंडळीने सुरू केलेल्या पोदार महाविद्यालयाचं नाव आवर्जून घेतलं जातं.

या महाविद्यालयानं केवळ अव्वल दर्जाचे सीए तयार केले असे नाही तर विविध क्षेत्रातील दिग्गज घडवण्यात हातभार लावला आहे. पोदार महाविद्यालयाने भंवरलाल जैन यांच्यासारखे उद्योजक, फारूक इंजिनिअर, दिलीप वेंगसरकर, संजय मांजरेकर, रवी शास्त्री यांसारखे क्रिकेटमधील अव्वल मोहरे, उदय टिकेकर, आरती अंकलीकर-टिकेकर, सुरेश खरे, विजय केंकरे, तुषार दळवी, दामोदर मावजो, अरूण म्हात्रे यांसारखे संगीत, नाटक, सिनेमा, साहित्य अशा विविध कलाक्षेत्रातील नामवंत कलाकार आणि साहित्यिक महाराष्ट्राला दिले आहेत. सूफी संगीतावर प्रभुत्व असलेली पूजा गायतोंडेसारखी गायिका, आज नावारूपाला येत असलेला अक्षय म्हात्रेसारखा अभिनेता किंवा नुकताच भारतासाठी खेळू लागलेला श्रेयस अय्यरसारखा क्रिकेटपटू हेदेखील याच महाविद्यालयाचे!

## १९ फेब्रुवारीला पोदारचे प्लॅटिनम ज्युबिली सेलिब्रेशन

एकंदरीतच गेल्या पंचाहत्तर वर्षात पोदार महाविद्यालयानं शैक्षणिक संस्थांमध्ये आपलं एक स्थान निर्माण केलं आहे. सर्वार्थाने यशस्वी अशी ही ७५ वर्षे साजरी करण्यासाठी महाविद्यालयाने त्यांच्या आजी-माजी विद्यार्थ्यांसोबत प्लॅटिनम ज्युबिली सेलिब्रेशनचे आयोजन करण्याचं ठरवलं आहे.

१९ फेब्रुवारीला सायंकाळी ५.३० वाजता सायन येथील षण्मुखानंद सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात पोदार महाविद्यालयाच्या यशस्वी प्रवासावर प्रकाश टाकणारे विविध उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांचा आढावा घेणारी कल, आज और कल ही स्मरणिका या समारंभात प्रकाशित करण्यात येणार आहे.